# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २७५ - २२ दिनांक १४/०९/२०२२

## जबरी चोरी व मोटार सायकली चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन २ लाख ६५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दिनाक ५.९.२०२२ रेजी ०३:०० वाजताच्या सुमारास फिर्यादी श्री. रविशंकर तिवारी हे प्रवासी रिक्षाने नालासोपारा रेल्वे स्थानक (पुर्वे) ते धानिवबाग येथे घरी जात असताना रिक्षा चालक व त्याचे दोन साथीदारांनी फिर्यादीचे जबरीने अपहरण करुन त्यांना मौजे मालजीपाडा गावातील मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील उड्डाणपुलावर आणुन त्यांना चाकुचा धाक दाखवुन त्यांच्या खिशातील एक मोबाईल, ४ हजार ५०० रुपये रोकड व इतर कागदपत्रे जबरीने काढुन घेतली. म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाण्यास गुन्हा नोंद क्रमांक ९०१/२०२२, भा.दं.वि.स. कलम ३६३, ३९४, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन व तांत्रिक विश्लेषणावरुन सदर गुन्हयातील जबरी चोरी करणारे आरोपी १) शिव प्रेमनाथ तिवारी, वय २४ वर्षे, २) अन्नु व्दारकाप्रसाद तिवारी, वय २० वर्षे आणि ३) शिवम भोलानाथ तिवारी, सर्व रा. नालासोपारा (पुर्व) यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून रिक्षा व गुन्हयात वापरण्यात आलेले हत्यार चाकु असा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या व्यतिरिक्त आरोपीतांनी वालीव पोलीस ठाणे हद्दीतील २, आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील १ व नवघर पोलीस ठाणे हद्दीतील १ मोटार सायकल अश्या एकुण ४ चोरीच्या मोटार सायकली जप्त करुन मोटार सायकल चोरीचे ४ व जबरी चोरीचा १ असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणून एकुण २ लाख ६५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

उघडकीस आणलेले एकूण गुन्हे : -

| अ.क्र | पोलीस ठाणे | उघडकीस आणलेला गुन्हा रजि. नंबर व कलम | गुन्हयातील जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| ०१ | वालीव पो.ठाणे | गु.नों.क्र.९०१/२२, भा.दं.वि.सं. कलम ३९४,३६३, ३४ | ओपो कंपनीचा मोबाईल, रिक्षा व हत्यार चाकु |
| ०२ | वालीव पो.ठाणे | गु.नों.क्र.७९७/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ | ॲक्टीवा मो.सायकल |
| ०३ | वालीव पो.ठाणे | गु.नों.क्र.६७५/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ | युनिकॉर्न मो.सायकल |
| ०४ | आचोळे पो.ठाणे | गु.नों.क्र.४११/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ | सुझुकी बर्गमन – १२५ मो.सायकल |
| ०५ | नवघर पो.ठाणे | गु.नों.क्र.५६६/२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ | बजाज पल्सर मो.सायकल |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. मिलींद साबळें, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, पो.ना. सतिष गांगुर्डे, पो.अंम. गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

--------------------oooo-------------------------